# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक २३.२.२००६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.२५) इतिवृत्त**

गुरूवार दिनांक २३ फेब्रुवारी २००६ रोजी स्थायी समितीची सभा मा.सभापती **श्री.काशीनाथ कोकाटे** यांचे अध्यक्षतेखाली ''मलिक अंबर स्थायी समिती सभागृह '' येथे दुपारी १२.३० वाजता ''वंदे मातरम्'' या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

(०१) श्री. कावडे साहेबराव राणुबा
(०२) श्री. खान मुजेब मिर आलम खान
(०३) सौ. खंदारे वंदना प्रकाश
(०४) श्री. गवळी रविकांत काशीनाथ
(०५) सौ.जधव संगिता विठ्ठलराव
(०६) सौ. लता दलाल
(०७) श्री. दाभाडे मिलींद यशवंत
(०८) श्री. दिलीप नारायण गायकवाड
(०९) श्री. नासेर नहदी मोहंमद याहीया नहदी
(१०) श्री. पांडे विनायक प्रभाकर
(११) श्री. बारवाल गजनन रामकिशन
(१२) श्री. विसपुते शशांक दामोधर
(१३) श्री. रेणुकादास वैद्य

**संवाद :**

श्री.मुजेब खान :वार्ड क्र १६मध्ये महानगरपालिकेच्या खर्चाने बांधलेला एक शादीखाना असून त्यावर माजे नगरसेकवकाचे वडीलाचे नाव लिहिलेले असून महापालिकेचे नाव कूठेही दिसून येत नाही. विचारणा केली असता खाजगी व्यक्तीचे आहे म्हणून सांगण्यात येते. महापालिकेने करोडो रूपये खर्च केलेले आहे. किती खच केलेला आहे. उत्पन्न किती झालेले आहे. व महापालिकेचे नाव का दिलेले नाही. याचा खूलासा करावा.

श्री. शंशांक विसपूते :गारखेडा भागातही महापालिकेचा एक मोठा हॉल बांधलेला असून त्याचा वापर कधी सुरू होईल याचा खूलासा करावा.

सौ. संगिता जधव :येत्या २५ तारखेला पुडंलिकनगर भागासाठी पिण्याचे पाणी देणार आहे. आजपर्यत पंप बसविलेले नाही. क्रॉस कनेक्शन दिलेले नाही.जीवन प्राधिकरण परवानगी देत नाही अशा परीस्थिती केंव्हा पाणी देणार आहे याचा खूलासा करावा वारंवार सभागृहात पाणी देण्याची मागणी केलेली आहे. गेल्या २७ डिसेंबरला महापालिकेवर पाण्यासाठी मोर्चा आलेला होता.सदर नागरीकांना एक तारखेला पाणी देण्यात येणार आहे असे सांगण्यात आलेले होते. अद्याप

कार्यवाही केलेली नाही. २५ तारखेपर्यत पाणी दिले नाही तर आम्ही नागरीकासोबत मोर्चात सामील राहू.

श्री.शंशांक विसपूते :पूंडलिकनगर, गारखेडा, बाळकृषणनगर, गुरूदास नगर, भारत नगर भागात पाईपलाईन टाकलेली आहे. मागिल बैठकीत आपण सांगितले पाणी देण्यात येईल. आतापर्यत काय कार्यवाही केलेली आहे याचा खूलासा करावा. सध्या टॅकरद्वारे पाणी दिले जते. पाईपलाईन द्वारे पाणी दिल्यास टॅकर बंद करता येतील. २५ तारखेला होईल असे आदेश दिले होते. काय प्रगती आहे?

श्री.रेणुकादास वैद्य :पाणी पूरवठा योजना राबविण्यासाठी दोन ते अडीच कोटीची तरतूद या वर्षासाठी केलेली आहे पाईप येणार आहे. नंतर काम सुरू होणार आहे.असे अधिकारी नियमित उत्तरे देत आहे पाईप केंव्हा येणार आहे. आजजरी ऑर्डर दिली तरी सदर कंपनीला ४५ दिवस पूरवठा करण्यासाठी लागणार आहे. असे असेल तर कामे केंव्हा करणार आहात. याचा अर्थ पाणी पूरवठयाचे संपूर्ण बजेट हे स्पील ओव्हर म्हणून पूढील वर्षी जणार आहे. या वर्षी कामे होत नाही असे वाटते.

श्री.शंशांक विसपूते :पाणी हा अत्यंत जिव्हाळयाचा प्रश्न असतांना पाईप घेण्यासाठी सर्वसाधारण सभेने तसेच स्थायी समितीचे वारंवार आदेशीत करूनही कार्यवाही का झालेली नाही.

सौ. वंदना खंदारे :वार्ड क्र ८६ मधे मेडीकल सोसायटी मध्ये पाणी येत नाही. महिलांना पाण्यासाठी फिरावे लागते. तसेच प्रियदर्शनी इंदिरानगर, महात्मा फुले पुतळयाजवळ घाण पाणी येत आहे. सदर पाण्याचा नमुना सभागृहात मी मागिल बैठकीत आणलेला होता. परंतु कोणतीही कार्यवाही आतापर्यत केलेली नाही खुलासा करावा.

श्री.दिलीप गायकवाड : देशात बर्ड फ्ल्यूची साथ आलेली आहे. महापालिकेच्या वतीने किती पोल्ट्री फॉर्मवर संबधीत अधिकारी यांनी पाहणी केलेली आहे किंवा चौकशी केलेली आहे.

(याच वेळी स. सदस्या सौ. संगिता जधव व सौ. वंदना खंदारे यांनी मा. सभापती यांचे डायसमोर उभे राहून अगोदर पूंडलिकनगर भागात पाणी देण्याबाबत कार्यवाही करावी नंतर सभांचे कामकाजचालावे म्हणून मागणी करतात.)

श्री.शंशांक विसपूते :येत्या २५ तारखेपर्यत पाणी देण्यात येणार आहे की नाही नसेल तर का देता येणार नाही. प्रशासनाने आतापर्यत काय कार्यवाही केलेली आहे.

श्री.मुजेब खान :येत्या २५ तारखेला पाणी देणार म्हणून मा.सभापती यांनी आश्वासन दिले होते. कुठलाही पाणी प्रश्न निर्माण झाल्यानंतर त्वरीत कार्यवाहीचे आदेश दिले जते. इतिवृत्तात येते परतू कोणतीही कार्यवाही होत नाही. एकीकडे सभापती आश्वासन देतात. प्रशासन कार्यवाही करीत नाही. नागरीकांना आम्हाला उत्तर दयावे लागते.

श्री.रेणूकादास वैद्य :पाणीपूरवठयाची कामे कशामुळे थांबलेले आहे खुलासा करावा.

मा.सभापती :स.सदस्यांच्या पाण्याविषयी ज्या भावना आहे त्यास मीही सहमत आहे. या बाबतीत महापालिकेची भुमिका समोर येणे अत्यंत आवशक आहे. स.सदस्यांनी आपआपल्या जगेवर बसावे.

श्री. रेणुकादास वैद्य :पाईपलाईन केंव्हा टाकणार प्रशासनाचा खूलासा घ्यावा.

मा.सभापती :पाणीपूरवठा अधिकारी यांनी खूलासा करावा.

कार्य.अभियंता(पापू) :पुंडलीकनगरची जे टाकी बांधलेली आहे ती ६७ कोटीच्या योजनेतून बांधलेली असून जेपर्यत जयकवाडीहून येणाऱ्या पाईपलाईनमधून पाण्यात वाढ होणार नाही तोपर्यत पाणी देणे शक्य नाही मागिल बैठकीत या संबधी खूलासा केलेला होता. या टाकीमधे डिस्टीब्युटर सिस्टीमद्वारे पाणी पूरवठा करावयाचा असेल तर कमीत कमी तीन एमएलडी पाणी दररोजलागेल. इतर ठिकाणे कूठलेतरी पाणी कमी करावे लागेल. सिडकोच्या पाईपलाईनद्वारे क्रॉस कनेक्शन टाकले तर सिडकोचे पाणी कमी होण्याची शक्यता आहे. म्हणून एमआयडीसीकडे जे जस्तीचे ा पाणी आहे. ते पाणी मागण्यासाठी पत्र दिलेले आहे. त्याचे उत्तर येईलच. माझ्या माहिती प्रमाणे २० एमएलडी पाणी जस्तीचे आहे. ते विकत घेवून पाणी देण्याचा प्रयत्न आहे. क्रॉस कनेक्शनसाठी महाराष्ट्र जिवन प्राधिकरणास पत्र दिलेले आहे. वेळ मागितला होता. एमआयडीसीकडून पाणी मिळण्यासाठी आठ दिवसात कळवतो.

श्री.मुजेब खान : पाणी केंव्हा येईल. खुलासा समाधानकारक नाही.

मा.सभापती :जे खूलासा केला तो खेदजनक आहे. गेल्या अनेक दिवसापासून जी ६७ कोटीची योजना होती ती सर्वांना विश्वासात घेवून केलेली होती. या योजनेसाठी महापालिका प्रशासनाने जी जबाबदारी होती ती पार पाडलेली नाही. सन२००१ मधे ही योजना कार्यान्वित होणार म्हणून करारनामा केलेला आहे. पाणीपूरवठयात वाढ होणार होती आता सन २००६ चालू आहे. तरी पाणी येवू शकले नाही. ही प्रशासनाची चूक नाही का नागरीकासाठी पाणी हे महापालिकेचे महत्वाचे बेसीक कर्तव्य आहे..जर पाण्यासाठी स.सदस्य यांना सभागृहात भांडे घेवून उभे रहावे लागत असेल तर यापेक्षा दुसरे दुर्दैव नाही नक्षत्रवाडी ते एन-५ पर्यत या जलवाहिनीवर किती ठिकाणी कनेक्शन देण्याचे करारनाम्यात आहे. जनतेमधे मतभेद करण्याचे काम जेहोत आहे ते थांबवावे. ६७कोटीची योजना का कार्यान्वित होवू शकली नाही याचा खूलासा करावा. व येत्या २५ तारखेला पूडंलिकगनर भागासाठी पाणी का देवू शकत नाही याचाही खूलासा करावा.

(अधिकारी यांनी दिलेला खुलासा समाधानकारक वाटत नाही असे म्हणत सर्व स.सभासद सभागृहा बाहेर जतात.)

मा.सभापती :सभा तहकूब करण्यात येते दूपारी ४.०० वाजता सभेला सूरूवात होईल. संबधीत पाणी पूरवठा अधिकारी यांनी सविस्तर माहिती सभागृहासमोर ठेवावी. (सभा तहकूब दुपारी १२.४५ वाजता सभेला पून्हा सूरूवात सायं.५.००वा.)

श्री.मुजेब खान :शहरातील पाणी प्रश्नाबाबत जे खूलासा मिळत आहे तो योग्य नाही. पाणी का देवू शकत नाही हा खूलासा होणे गरजेचे आहे.

मा.सभापती :ज्या कारणासाठी सभा तहकूब केली होती. त्या संबधीचा खुलासा कार्यकारी अभियंता हे करतील.

सौ.संगिता जधव :पाणी का देवू शकत नाही लेखी देण्यात यावे.

श्री.मुजेब खान :जक्कात पावती बूक संदर्भात मी मागिल बैठकीत मुद्या उपस्थित केलेला होता. या बाबत चौकशी करण्याचे आदेश मा.आयुक्तांनी दिलेले आहे, असे सांगण्यात येते परंतू चौकशी अधिकारी यांना चौकशीसाठी कोणतेही बूक मिळालेले नाही. याचा अर्थ असा की मा.आयुक्त, उपआयुक्त हे सभागृहात दिशाभूल करणारे आश्वासन देतात का? जे अधिकारी दोषी आहे त्यांचेवर कार्यवाही का होत नाही. ८० ते ९० लक्षचा भ्रष्टाचार झालेला आहे. वारंवार चर्चा सभागृहात होते इतिवृत्तात येत आहे. कार्यवाही होत नाही हे बरोबर नाही. सहा महिण्यापूर्वी चौकशीचे आदेश केलेले होते. अद्याप चौकशी साठी दिलेले नाही. चौकशीसाठी वेळ लावण्यात येतो. पुढील बैठकीपर्यंत कार्यवाही झाली नाही तर या सभागृहात मी बसणार नाही माझा वेळ वाया घालवणार नाही. याची नोंद घ्यावी.

मा.सभापती :उपआयुक्त महसूल यांना सूचना करण्यात येते की स.सदस्य श्री. मुजेब खान यांनी जे जक्कात पावती बूक संदर्भात चौकशीची मागणी केलेली होती ते बुक चौकशीसाठी मुख्यलेखा परीक्षक यांचे कडे दोन दिवसात देण्यात यावेत.व पूढील बैठकीत माहिती देण्यात यावी. मा.आयुक्त यांनीही या संदर्भात सूचना केलेल्या होत्या परंतू त्याची अमलबजवणी करण्यात आलेली नाही.

श्री.गजनन बारवाल :संपूर्ण देशामध्ये बर्ड फ्ल्यूची चर्चा आहे. त्यासाठी नियंत्रण कक्ष महापालिकेने उघडलेले आहे. या शहरात मोठया प्रमाणात पोल्ट्री फॉर्म आहेत मोठया प्रमाणात कोबंडया विक्री होत आहे.अधिकृत किती व अनधिकृत किती तसेच या रोगाची लागण या शहरात झाली तर अनेक समस्यांना तोंड दयावे लागेल. यासाठी काय उपाययोजना आरोग्य विभागाने केलेली आहे. तसेच शहरात येणारे अंडी व कोंबड्या येण्यास बंदी घालणार आहात काय स्पष्ट खुलासा करावा.

सौ. लता दलाल :जेंव्हा शासनाचे आरोग्य विभागाने या संदर्भात आदेश काढले तेंव्हा महापालिकेचे आरोग्य विभागा व पशुवैद्यकीय विभागाचे कर्मचारी अधिकारी घाईने शहरातील अनधिकृत दुकाने शोधण्याचे काम करीत होती. यावरून हे दोन्ही विभाग किती काळजी घेते सिध्द होते. हा खुलासा अपेक्षीत आहे की किती पोल्ट्री फॉर्म शहरात आहेत. किती मटनशॉप व चिकन शॉप अनधिकृत आहे. किती बंद केलेली आहे. किती दिवसापासून यासाठी प्रशासनाचा संबधीत विभाग कार्यरत होता. व वर्षभरात किती लोकांवर कार्यवाही केलेली आहे याचा खुलासा करावा.

श्री.विनायक पांडे :शहरात जेमोकाट कुत्री फिरतात. गाडी कुठे फिरतांना दिसून येत नाही. तसेच शहरात उघडयावर मांस विक्री होते. अशा किती दुकानदारावर कार्यवाही केलेली आहे.

सौ.लता दलाल :शहरातील मध्यवर्ती भाग जसा सिल्लेखाना असेल अशा ठिकाणी रात्री किंवा दिवसाही मोठया प्रमाणात जनावरांची कत्तल होत असते.त्यामूळे रक्त. मांसाचे तुकडे हे रस्त्यावर दिसून येईल. दुर्गंधी सूटलेली असते परंतू आरोग्य विभागाकडून कोणतीही दखल घेतली जत नाही. सर्वसामान्य लोकांना नाक बंद करून तेथून जवे लागते एवढी दुर्गंधी येते.सदर मांसाचे तुकडे हे कुत्रे खातात. यामूळे बर्ड फ्ल्यू सारख्या एक अज्ञात रोग निर्माण होत आहे व त्यामूळे कुत्री मरतात. अशी कुत्री नागरीकांना चावल्यानंतर त्या नागरीकांना ॲडमीट व्हावे लागत आहे. माझ्या वार्डात चार लोकांना कुत्री चावलेली असून ही बाब संबधीत विभागाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतरही कार्यवाही होत नाही. अशी मोकाट कुत्री ही सर्वच भागात फिरतांना दिसतात. च यामूळे वेगळा रोगाचा फैलाव या शहरात झाला तर यास जबाबदार कोण असणार आहे याचा खूलासा करावा.

मा.सभापती :बर्ड फ्ल्यूच्या संदर्भात प्रशासनाने काय काळजी घेतलेली आहे काय कार्यवाही केलेली असून किती पथके निर्माण केलेली आहे. किती दुकानधारकावर कार्यवाही व त्या रोगाची लागण या शहरात आहेत का तसेच किती ठिकाणचे नमुने घेतलेले आहे व तपासणी साठी पाठविलेले आहे तसेच शहरात किती कोबडया येतात.या सर्व बाबतीत खुलासा करावा.

संचालक(प्रा.सं.) :या संदर्भात मा.महापौर यांचेकडे बैठक घेण्यात आलेली होती. व आरोग्य विभागाअंतर्गत पथके तयार करण्यात आलेली आहे. रविवारच्या रात्रीपासून जकात नाक्यावर असे आदेशीत करण्यात आले की कोणतेही कोंबड्याच्या गाड्या शहरात येवू देवू नये. त्या तारखेपासून कोणतीही गाडी आलेली नाही. उपसंचालक पशुसंवर्धन यांचे सोबत जेदोन पोल्ट्री फॉर्म शहराच्या हद्यीत आहे . तेथे कोणतेही बर्ड फ्ल्यू आढळून आलेले नाही. प्रत्येक झोनमधे एक पथक तयार केलेले आहे. सोमवार पासून प्रत्येक शहरातील दुकानावर पाहणी करण्यात आलेली आहे व कोणतेही चिकन विक्री होवू नये म्हणून दक्षता घेण्यात येत आहे.या शिवाय रॅपीड ॲक्शन स्क्वॉड तयार करण्यात आलेला असून त्यात शासनाचे डॉक्टर व तसेच सहा. संचालक पशुसवर्धन असून महापालिकेचे डॉक्टर आहेत. या पथकास तीन ते चार कर्मचारी मदतीसाठी दिलेले आहे. हे पथक पाहणी करीत आहे. तसेच नियंत्रण कक्ष स्थापन केलेला असून प्राणी संग्रहालयात एक कर्मचारी सतत २४ तास तक्रार घेण्यासाठी ठेवण्यात आलेले आहे. कालच उपसंचाल पशुसंवर्धन यांनी एक बैठक घेवून असे कळविले की जेबर्ड शहरात यायचे असेल त्या संबधीताकडून प्रमाणपत्र घ्यावे की या बर्डाला कोणत्याही प्रकारची रोगाची लागण नाही. असेच बर्ड शहरात येवू दयावे. त्यानूसार सर्व नाक्यावर तशा सूचना केलेल्या आहे. काल

जलना नाक्यावर अंडीची गाडी आलेली होती त्यांनी उपसंचालक जलना यांनी प्रमाणपत्र दिलेले होते. तसेच ढोरकीन येथील एक गाडी अंडीची आलेली होती .त्याची तपासणी करूनच शहरात आलेल्या आहेत.

श्री.मुजेब खान :शहरात किती लिगल व अनधिकृत दुकाने आहेत याचा खूलासा केलेला नाही.

संचालक(प्रा.सं.) :अधिकृत २७ व अनधिकृत ४८ दुकाने आहेत. जे अनधिकृत आहे त्यांना नोटीसेस दिलेल्या आहेत. एकूण दुकाने ७५ आहे.

श्री.मुजेब खान :माझ्या वार्डातच किमान २५ दूकाने असतील संपूर्ण शहरात ७५ पेक्षा जस्त दूकाने असतील. चूकीची माहिती देत आहे.

सौ.लता दलाल :मोकाट कूत्रे पकडण्याची कार्यवाही होत नाही. बर्ड फ्ल्यूच्या च्या बाबतीतही सविस्तर माहिती दिली नाही.

श्री.गजनन बारवाल :हॉटेल मधील चिकनवर बंदी घातलेली आहे काय तसेच तेथील अहवाल समाधानकारक आहे काय याचा खूलासा करावा.

संचालक(प्रा.सं.) : अनधिकृत मांस विक्री करणाऱ्या २२४ लोकांवर पोलीसात गुन्हा नोंद केलेला आहे.

श्री.मुजेब खान :संबधीत लोकांवर कार्यवाही केली परंतू त्या दूकाना आज्ही पून्हा चालू केलेल्या आहेत काय?

संचालक(प्रा.सं.) :ज्या दुकानांना परवानगी देवू शकतो अशा दुकानांच नोटीसा दिलेल्या आहेत. स्थायी समितीच्या आदेशाप्रमाणेच पक्के बांधकाम असणाऱ्या दुकानांनाच परवानगी देवू .

सौ.दता दलाल :स्थायी समितीच्या आदेशाप्रमाणे कार्यवाही करणार संबधीत विभागाचे काम काय आहे. प्रशासनाने त्यांचे पातळीवर कार्यवाही करावी. २४० लहान टपऱ्या आहेत का. एवढी संख्या एक वार्ड कार्यालया अंतर्गत असू शकते. उद्या रोगराई उद्‌भवली तर काय करणार?

श्री.दिलीप गायकवाड :शहरात दररोजबकऱ्याची कत्तल किती होते. व महापालिकेला त्याचा फायदा किती याचा खूलासा करावा.

संचालक(प्रा.सं.) :दररोज १२५ ते १५० बकऱ्याची स्लाटर हाऊस येथे नोंद होते महिण्यात जऋळपास ४०००बकऱ्याची कत्तल केली जते.

मा.सभापती :बर्ड फ्ल्यूच्या संदर्भात जी काळजी घ्यावयास पाहिजेहोती ती घेतलेली दिसून येत नाही. किती ठिकाणी नमूने तपासणीसाठी पाठविलेले आहे.

संचालक(प्रा.सं.) :संबधीत विभाग नमूने तपासणी साठी पाठवतात. चार दिवसापासून चिकनचे दुकान १०० टक्के बंद आहेत.

मा.सभापती :शहरात अनेक ठिकाणी उघड्यावर मटन, चिकन विक्री होते. ज्या अटी शर्ती घालून दिलेल्या आहे त्याचे बंधन पाळले जत नाही. अशी परीस्थिती दिसून येईल. याचा अर्थ असा नाही की लायसन्स घ्यायचे नाही व टपऱ्या टाकून वाटेल ते धंदा करायचा असा होत नाही.आताच स.सदस्य यांनी म्हटले की माझ्या एकाच वार्डात २५ दुकाने दिसून येतील. महापालिकेचे दोन प्रकारे

उत्पन्न कमी होत आहे एकतर परवानगीच्या माध्यमातून महापालिकेस उत्पन्न मिळू शकते तसेच कर्मचारी उपलब्ध असतांना तो कार्यरत नाही असे असतांना अतिक्रमण करणारांना प्रोत्साहन देत आहोत संबधीत अधिकारी यांना सुचना करण्यात येते की एक जेमांस विक्री करणारे आहे त्यांना नियमाप्रमाणे परवानगी दयावी. नसता सर्वांवर सम प्रमाणानुसार कार्यवाही करावी. तसेच हैद्राबाद कडून येणाऱ्या रेल्वेने मोठया प्रमाणात बर्ड व अंडी येत आहे. त्या बाबतीत काय कार्यवाही केलेली आहे.

संचालक (प्रा.सं.) :प्रत्येक झोन अंतर्गत पथक तयार केलेला आहे. दोनच ट्रक आलेले होते त्यांचेकडून प्रमाणपत्र घेवूनच सोडलेले आहे. सोमवार पासून पूर्ण चिकन विक्रीचे दुकाने बंद आहेत.

मा.सभापती :रेल्वे मार्गाने मोठया प्रमाणात बर्ड ची या शहरात आवक होत आहे. त्याठिकाणी कूणीही देखरेखसाठी कर्मचारी नाहीत. त्वरीत त्या ठिकाणी पथक नियुक्त करावे. संपूर्ण तपासणी झाल्याशिवाय ते शहरात येवू देवू नये.

श्री.मुजीब खान :शहरातील सर्व मटन मार्केचा सर्वे करावा. व जेवढयाही दुकाने असतील त्यांना महापालिकेच्या जगेवर एकाच ठिकाणी शिफ्ट करण्यात यावे.अशी कार्यवाही केल्यास एक प्रकारचे चांगले काम होईल. १० वर्षापासून कार्यवाही चालू आहे अदयाप कार्यवाही केली नाही. तसेच रात्रीच्या वेळी कुत्रे हे रस्त्यावर असतांत लहान मोठया व्यक्तीना चावतात. महानगरपालिकेमार्फत पकडण्याची कार्यवाही रात्रीच्या वेळी होत नाही. माझ्या वार्डात औरंगाबाद टाईम्स कॉलनीमधे एका मूलास कुत्र्याने चावा घेतला. रात्रीच्या वेळी पकडण्याची कार्यवाही होवू शकते काय?

संचालक(प्रा.सं.) :दर महिण्याला ५०० कुत्रे पकडण्यात येते. जनेवारीपर्यत ४९४८ कुत्रे पकडले आहेत. दररोजविस कुत्रे पकडल्या जतात.

श्री.मुजीब खान :औरंगाबाद टाईम्स कॉलनी तसेच हिनानगर रत्यावर कुत्र्यांची टोळी दिसून येईल. दोन लहान मुलांना कुत्र्याने चावा घेतला.एक मुलगा ३ रीच्या वर्गात शिकत आहे. त्यास कुत्र्याने मोठया प्रमाणात चावा घेतला आहे . लोक जण्यायेण्यास घाबरतात अशी परीस्थिती आहे.

संचालक(प्रा.सं.) : तसा प्रस्ताव दिला आहे.

श्री.मुजीब खान :प्रत्येक वार्डात कमीत कमी २०० ते ५०० कुत्रे दिसून येतील. रात्रीच्या वेळी हे कुत्रे बाहेर निघतात त्यांना रात्रीच्या वेळी पकडण्याची कार्यवाही करावी.दररोज २० कुत्रे पकडून ही समस्या सुटणार नाही.

श्री.विनायक पांडे :रॅबीक्स इन्ज्क्शेनसाठी १० लक्षची तरतूद होती ती खर्च झालेली आहे काय?

श्री.मिलींद दाभाडे :कुत्र्याप्रमाणेच डुकराचाही सुळसुळाट मोठया प्रमाणात आहे. डुकरे किती पकडले जते. तसेच शहरात राजस्थानी लोक गायी घेवून फिरतात. पूर्ण वाहतूक थप्प होते. या बाबतही कार्यवाही करावी.

मा.आयुक्त :डुकरांच्या संदर्भात कसे मारायचे याची तरतूद आहे.

मा.सभापती : ॲन्टी रेबीज इन्ज्क्शेनच्या बाबतीत मेंडीकल कॉलेजला पत्र देवून कार्यवाही करण्यात यावी.

सौ.लता दलाल :पशुसंवर्धन विभाग हा निष्क्रीय झालेला आहे असे दिसून येते. योग्य ती कार्यवाही या विभागाने करावी व पूढील बैठकीत काय कार्यवाही केलेली आहे. याची माहिती द्यावी.

सौ. संगिता जधव :पाण्या संदर्भात मी प्रश्न उपस्थित केलेला होता. तीन तास बैठक तहकूब करण्यात आलेली होती. (.याच वेळी स.सदस्या सौ. खंदारे व सौ. संगिता जधव या सभागृहात भांडे घेवून सभापती डायस समोर भांडी खाली फेकतात.) खुलासा जेपर्यत होत नाही तोपर्यत सभा चालू देणार नाही.

मा.सभापती :पाणी पूरवठा अधिकारी यांनी खुलासा करावा.

कार्य. अभियंता(पापू) :मा. सभापती यांनी आदेश केल्याप्रमाणे पुडंलिकनगर भागात पाणी पूरवठा करण्या बाबतची अडचण संदर्भात मा.सभापती यांना पत्राने उत्तर देण्यात आलेले आहे.

मा.आयुक्त :पुंडलिकनगर भागात व इतर ठिकाणी पाणी देण्यासाठी ३ एमएलडी पाणी जस्तीचे आवशक आहे. ते सध्या नाही. यासाठी प्रयत्न असे चालू आहे की एकतर एमआयडीसी कडून पाणी घेणे व दुसरे पाणी वाढविणे. ३० जुन पूर्वी पाणी वाढविणे शक्य नाही. त्यापूर्वी एमआयडीसीकडून पाणी मिळाले तर सात दिवसात पाणी दिले जईल. एमआयडीसी पाणी देईल याची गॅरंटी नाही. ३७५० लोक तेथे राहतात. गुंठेवारी भागात राहतात त्यांना पाणी दयायचे आहे. त्या लोकांना गुंठेवारी येण्यासाठी नोटीसेस दिलेल्या आहेत त्यापैकी १८०० लोकांनी फक्त संचिका तयार केलेली ३० जून पर्यत ५० टक्के लोकांनी गुंठेवारी रेग्यूलाईज करून घेतले तर पाणी दिले जईल. एमआयडीकडून पाणी मिळाले तर ३० जून पूर्वी दिले जईल त्यासाठी वर्षाला २ कोटी खर्च अपेक्षीत असून त्यास याच सभागृहाची मान्यता घ्यावी लागेल.

सौ. संगिता जधव :वार्डातील ६० टक्के लोकांनी पैसे भरणा केल्यानंतर काम सुरू होईल मा.आयुक्तानी आश्वासन दिलेले होते. माझ्या वार्डातील अनेक लोकांनी गुठेंवारी अंतर्गत पैसे भरणा केलेले आहे.

मा.आयुक्त :१८०० लोकांनी ५०० रूपये भरणा केलेले आहे चलन ५० ते ६० टक्के लोकांनी भरलेले आहे. एकूण ३७५० लोक आहेत.फक्त पाच लोकांनी पूर्ण चलन भरणा केलेले आहे. ३० जून पूर्वी तेथील लोकांनी रेग्यूलेशन करून घ्यावे जर केले तर एमआयडीसी कडून पाणी मिळाले तर ३० जून पूर्वीही पाणी पूरवठा केला जईल.

मा.सभापती :जे खुलासा केलेला आहे तो प्रशासनाच्या आखत्यारीत केलेला आहे. सन २००१ पर्यत पाणीपूरवठा योजना करणार होते ती का केलेली नाही यात प्रशासनाची चूक नाही का ?पाणी देण्यासाठी गुंठेवारी व पाण्याचा संबध नाही. शासन तांड्यावर पाणी देण्याची घोषणा करीत आहे. परंतू या शहरातील

नागरीकांना पाणी देण्याची कार्यवाही होत नसेल तर योग्य नाही. २००१ मधे अमलबजवणी होणार होती का झालेली नाही.

मा.आयुक्त :२००१ पासून पाणी वाढले नाही याची जबाबदारी ही एमजेपीची होती. ६५ एमएलडी पाणी देवू म्हणून एमजेपीनेच म्हटले होते. परंतु पून्हा सदर विभागच टेक्नीकली पाणी देणे शक्य नाही म्हणून सांगातात. पाणी वाढविले असते तर १०० टक्के पाणी देता आले असते. मागिल जुलै महिण्यात जेंव्हा लक्षात आले की पाणी वाढणार नाही म्हणून महापालिकेने च १.६२ कोटी खर्च करून १२ एमएलडी पाणी वाढवित आहोत. ३० जून नंतर तेथे पाणी दिले जईल तोपर्यत तेथील लोकांनी त्यांचे घर गुठेंवारीत रेग्यूलाईज करावे. गुंठेवारीचीच सुरूवात पुडंलिकनगर भागातून केलेली आहे.

श्री.मुजीब खान :पाणी शिवाय जनता राहू शकत नाही. इतर कामे उशीरा झाली तरी चालेल.

मा.आयुक्त :गेल्या दहा वर्षात एक थेंबही पाणी वाढविले नाही. एमजेपीचे अधिकारी यांचे समवेत बैठक झालेली होती. पाणी वाढवून मिळत नाही जेंव्हा कळले त्यानंतर १.६८ लक्ष हे स्कीममधील कमी केले व व यास सर्वसाधारण सभेची मान्यता घेवून टेंडर काढले आता ते काम चालू आहे. जून मधे १२ ते १५ एमएलडी पाणी जस्तीचे राहणार आहे.

मा.सभापती :या योजनेसाठी सभागृहात वारंवार चर्चा झालेली असून ६.३० कोटी रक्कमेला मान्यता दिलेली होती परंतू कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

मा.आयुक्त :या संदर्भात एमजेपीने टेक्नीकल मंजूरी दिलेली होती. कॅबीनेटपर्यत गेले. ६५ एमएलडी पाणी वाढणार आहे. त्यानंतर असे कळले की पाणी वाढणार नाही. एमआयडीकडून पाणी मिळणार हे संबधीत अधिकारी यांनी तोंडी मान्य केलेले आहे. दरवर्षी १.८० कोटी खर्च आहे तो देण्यास तयार आहे. जेपर्यत पाणी मिळत नाही तोपर्यत शाश्वती देवू शकत नाही. कोणत्याही परीस्थितीत ३० जून नंतर पाणी देता येईल.

सौ.लता दलाल अत्यंत गाभीर्याने पाण्याचा प्रश्न स. सदस्यांनी मांडलेला आहे. वार्डात फिरतांना नागरीकासमोर आम्हाला जवे लागते. आता चार महिने हे उन्हाळयाचे आहेत.या दिवसात पाणी देणार नसेल तर अर्थ नाही. विजेची टंचाई आहे पाणी वेळेवर शहरातही येणार नाही. परंतू या भागात आणीबाणीची परीस्थिती म्हणूनका होईना काय योजना केलेली आहे याचा खूलासा करावा.

मा.आयुक्त :एमआयडीसी कडून मार्च पर्यत पाणी मिळेल अशी अपेक्षा आहे पाठपूरावा चालू आहे परंतू १०० टक्के अशी खात्री आहे की ३० जूननंतर पुंडलिकनगर या भागात पाणी दिले जईल.

श्री.कावडे साहेबराव :११४ अनधिकृत वसाहती आहेत या वसाहतींना पाणी देणार की नाही. याचा खूलासा करावा. गुंठेवारी भाग नियमित केल्यानंतर लगेच पाणी देणार आहात का?

मा.आयुक्त :१२ ते १५ एमएलडी पाणी वाढविणार आहोत त्याशिवाय २० एमएलडी पाणी एमआयडीसीकडून घेणार आहोत. असे ३२ एमएलडी पाणी वाढवू शकतो. १० कोटी खर्च वाढेल व ३.७० लक्ष लोकांना जस्त पाणी पुरवठा होवू शकतो.

श्री.दिलीप गायकवाड :महापालिका हद्दीत ज्या विहिरी आहेत त्या महापालिकेच्या ताब्यात घ्याव्यात व पिण्याच्या पाण्याशिवाय इतर वापरासाठी ते पाणी उपलब्ध करून देण्याची कार्यवाही करता येईल का? पाहण्यात यावे.

मा.सभापती :प्रशासनास सूचना करण्यात येते की, पुंडलिकनगर भागात पाणी पूरवठा करण्यासाठी जेकाम अपूर्ण राहिलेले आहे ते होण्यासाठी जीवन प्राधिकरणा पत्र देवून कार्यवाही करावी व ८ दिवसाच्या आत पाणी देण्याची कार्यवाही करावी. त्याची प्रत सभापती म्हणून मला देण्यात यावी. तसेच ६५ लक्ष खर्च करून फारोळा या ठिकाणी जे प्लॅन पाणी उपलब्ध करून देण्यासाठीचा होता ते पाणी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीकोनातून ८ ते १५ दिवसात कार्यवाही करावी.पाणी देण्यास गुंठेवारी रेग्यूलर झाल्याशिवाय पाणी नाही ही भूमिका प्रशासनाने घेवू नये. गुठेवारीचे काम चालू राहिल आधी पाणी दयावे. पाणी पूरवठा करण्याच्या संदर्भात जी कार्यवाही रोजच्या रोज होते त्याची माहिती देण्यात यावी. मा.महापौर यांनाही माहिती दयावी. स.सदस्यांचा भावनाचा सभागृह आदर करीत आहे.सभागृहातील कामकाजस मदत करावी. घेतलेल्या निर्णयाची कार्यवाही करावी.

मा.आयुक्त :गुंठेवारी व पाण्याचा संबध नाही परंतू गुठेवारी भागात काही पाण्यासाठी नव्याने पाईपलाईन टाकावी लागेल. तो खर्च गुंठेवारीतून करावा लागेल. ५० टक्के गुंठेवारी भागात पाईपलाईन नाहीत. त्यासाठी गुंठेवारी भाग नियमित करणे गरजेचे आहे.

श्री.दिलीप गायकवाड : रेल्वे स्टेशन उड्डाणपुलाखाली जेअतिक्रमण होत आहे ते काढण्यात यावे.

प्रशासकीय अधिकारी : सदर ठिकाणी पाहणी करून उद्या कार्यवाही करण्यात येईल.

मा.सभापती : आजच्या आजसदर ठिकाणी जवून कार्यवाही करावी.

**<u>विषय क्र.२३१ :</u>**

दिनांक १०.१.२००६ (का.प.क्र.२०) रोजे संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**<u>संवाद :</u>**

श्री.गजनन बारवाल :इतिवृत्तातील पान क्र ६ वर सौ.बारवाल असे टंकलेखन झालेले आहे त्या ऐवजी सौ. लता दलाल असे टाकण्यात यावे.

मा.सभापती : दुरूस्तीसह इतिवृत्त कायम करण्यास मंजूरी देण्यात येते.

**<u>ठराव :</u>**

पान क्र.६ वरील श्री.बारवाल यांचे नांवातील दुरूस्तीसह दिनांक १०.१.२००६ रोजे संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र.२३२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, पहाडसिंगपुरा स्वयंसिध्द सोसायटी लगत रस्त्याचे संरक्षित भिंतीच्या बांधकामासह खडीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रू.१२,९९,९६०/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदर कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत १७ कोरी निविदापत्रके विकल्या गेली व स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी ७ निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | |
|---|---|
| १. उत्तम की. पंडीत | ३३.१६% कमी दराने |
| २. मुबारक एम. पठाण | २८.१११% कमी दराने |
| ३. एस.एम.इब्राहीम | २५.५९९% कमी दराने |
| ४. डी.अजितसिंग | २४.८४% कमी दराने |
| ५. विजय जेंधळे | २३.००% कमी दराने |
| ६. एस.एम.काझी | २२.१५% कमी दराने |
| ७. एस.अे.देशमुख | १९.२५% कमी दराने |

वरील प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा ३३.१६% कमी दराची श्री.उत्तम की. पंडीत यांची निविदा आहे. करीता त्यांचेकडून सदर काम करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री. मुजेब खान :३३ टकके बिलोने काम घेत आहे कामाची कॉलीटी देणार आहे काय?अशा पध्दतीने घेण्यात आलेली कामे ही सहा आठ महिण्यानंतर संबधीत ठेकेदार सुरूवात करीत आहे. सहा महिण्यानंतर पून्हा ते काम खराब होते.

श्री.विनायक पांडे :संपूर्णत: हा नवीन रस्ता आहे. स्वयंसिध्द हौसींग सोसायटीच्या बाजूला डोंगर आहे डोंगरातून पाण्याचा प्रवाह येतो. संरक्षित भिंत सह खडीकरण करणार आहे. तेथे केंव्हाही खडीकरण झालेले नाही. संपूर्ण नविन रस्ता आहे. असे असतांना ३३ टक्के बिलोने संबधीत ठेकेदार काम करणार असेल तर चांगल्या प्रतिचे काम होईल का ?

श्री.रेणुकादास वैद्य :जर ३३ टक्के बिलोने एखादया ठेकेदारास काम परवडत असेल तर याचा अर्थ असा ही होवू शकतो की अंदाजपत्रक चूकीचे तयार केलेले असेल.

सौ.लता दलाल :जस्त बिलोने प्रस्ताव येत असतांना प्रशासनानेच त्याची काळजी घेणे गरजेचे आहे. ३३ टक्के बिलोने जर कुणी ठेकेदार काम घेत असेल तर कामाची प्रत कशी देणार माझ्याही वार्डात एक काम चालू आहे ३१ टक्के बिलोने ते संबधीतानी घेतलेले असून अमूक पाईपलाईन नको काम चांगले करावे अशी सूचना केली तर संबधीत ठेकेदार असे सांगतात की मी ३१ टक्के बिलोने काम करीत आहे मला त्यात काही तरी फायदा झाला पाहिजे अशी भावना ठेवून काम होत असेल व पून्हा तेच काम सहा महिण्यानंतर करण्याची वेळ पडत

असेल तर योग्य नाही. अशा प्रकारचे प्रस्ताव सभागृहात यापूढे येवू नये याची प्रशासनाने काळजी घ्यावी.

मा.सभापती :विषय क्र २३२ नामंजूर करण्यात येत असून अल्प मुदतीची फेरनिविदा काढण्याची कार्यवाही करावी.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरील कामासाठी पुन्हा निविदा मागविण्यात याव्यात असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.२३३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, वॉर्ड क्र.६४ क्रांतीचौक येथील विकासनगर मधील रस्त्यांचे कॉंक्रीटींग करणेच्या कामाचे अंदाजपत्रक र.रू.१०,००,०००/- चे असून या कामाची निविदा मागविण्यात आल्या असता, एकूण ६ भरलेली निविदापत्रके प्राप्त झाली. सदर निविदांचे दर खालील प्रमाणे आहेत.

१. विजय मालोदे अं.प.दरापेक्षा ०.५०% कमी
२. सुंदर कन्स्ट्रक्शन अं.प.दराने
३. मे.आदीनाथ कन्स्ट्रक्शनअं.प.दरापेक्षा १% जस्त
४. मोना कन्स्ट्रक्शन अं.प.दरापेक्षा ३२५% जस्त
५. राहूल दाशरथे इएमडी नसल्यामुळे निविदा उघडली नाही.
६. जयलक्ष्मी कन्स्ट्रक्शन कमी रक्कमेची इएमडी असल्यामुळे निविदा उघडली नाही.

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा श्री.विजय मालोदे यांची असून ती अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५०% कमी दराची आहे. मा.आयुक्त यांनी सदर काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% कमी दराने करण्याकरीता मान्यता दिलेली आहे. तरी श्री.विजय मालोदे यांची अं.प.दरापेक्षा २% कमी दराची निविदा मंजूरीस्तव सादर.

**संवाद :**

मा.सभापती :या विषयाच्या संदर्भात सदर एजन्सीने किती बिलोने इतर आणखी कामे घेतलेली आहे अशी किती कामे आहेत. किती कामे सुरू केलेली आहे. मागिल बैठकीत अशा जस्तीचे काम घेणाऱ्या एजन्सीची यादी तयार करण्याचे सूचना केलेल्या होत्या यादी केलेली आहे काय खुलासा करावा.

अति.शहर अभियंता :अति.शहर अभियंता या विभागा अंतर्गत डांबरीकरण व पुर्नरडाबरीकरणाची व काही कामे खडीकरणाची असे कामाचे स्वरूप असते. एकाच एजन्सीने एका पेक्षा जस्त कामे ही डांबरीकरणाची, पुन:र्डांबरीकरणाची व क्रॉक्रीटची कामे घेतलेली आहेत. एका एजन्सीला जस्तीची कामे ही जहीर निविदेद्वारे मिळालेली आहे. या एजन्सीने डाबरीकरणाची कामे करण्यास सूरूवात केलेली आहे एकच एजन्सी अशी होती की, त्यानी २ टक्के रक्कम भरणा केलेली नव्हती त्या एजन्सीस कालच नोटीस देण्यात आलेली आहे की २ टक्के रक्कम भरणा केली नाही तर दुसऱ्या क्रमांकावरील एजन्सीला काम दिले जईल व महापालिकेत यापूढे काम दिले जणार नाही. आजत्या एजन्सीने २ टक्के रक्कम भरणा केलेली

असून दोन दिवसात काम सुरू करणार आहे. त्याच प्रमाणे कॉंक्रीट ब्लॉकची कामे ही एका पेक्षा जस्त कामे एका एजन्सीस दिलेली आहे. तीही कामे सदर एजन्सीने शहरात सुरू केलेली आहे. कामे सुरू केलेली नाही म्हणून कोणत्याही एजन्सीवर कार्यवाही केलेली नाही. परंतू कामामधे हलगर्जेपणा केल्यास नक्कीच कार्यवाही होईल.

श्री.मुजेब खान :माझ्या वार्डातील एक काम होते ते सूरू करण्यात येईल असे म्हटले होते परंतू अदयाप सूरू करण्यात आलेले नाही. काही ठराविक ठेकेदारांना टेंडर दिले जते. . खोज नावाचे एक व्यक्ती होते त्यांनी टेडर भरले हाते. त्यांना टेंडर परत करावयास भाग पाडले.दुसऱ्याला दिले गेले. रिटेंडर केले. अशी परीस्थिती असे तर योग्य नाही.

अति.शहर अभियंता :जहीर नविदा मागविल्या जतात.

श्री.मुजेब खान :दोन चार लोकांचा अनूभव आहे टेडंर काढल्यानंतर त्यांना संबधीत अधिकारी ताकीद देतात की टेडर भरू नये.जे ठराविक ठेकेदार आहेत १० ते १५ वर्षापासूनचे त्यांना कामे दिली जतात. नवीन कोणीही टेंडर भरून देत नाही अशी परीस्थिती आहे.

मा.सभापती :सर्व कार्य. अभियंता यांना सूचना करण्यात येते की, स.सदस्य श्री. मुजेब खान यांनी जी बाब निदर्शनास आणून दिलेली आहे.अत्यंत गंभीर स्वरूपाची बाब आहे.कामाची कॉलीटी मिळत नाही. त्या संदर्भात जी जी कामे ज्या ज्या एजन्सीला देण्यात आलेली आहे त्या सर्व कामाची यादी व ज्या एजन्सीला काम दिलेले असेल त्या एजन्सीचे नावासह या पूर्वी जी कामे झालेली आहे त्या कामासह काम केलेल्या एजन्सीची यादी संपूर्ण माहिती सभागृहाला पुढील बैठकीत सादर करावी. मागिल बैठकीत असा निर्णय घेतलेला होता की ज्या एजन्सीला इएमडी मिळालेली नसेल त्या एजन्सीला पुन्हा टेंडर देण्यात येवू नये. त्या बाबतीत अंमलबजवणी करण्यात यावी. विषय मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.६४ क्रांतीचौक येथील विकासनगर मधील रस्त्यांचे कॉंक्रीटींग करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधरकांशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदरील काम श्री.विजय मालोदे यांचेकडून अं.प.दरापेक्षा २% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२३४ :**

अतिरिक्तशहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, औरंगाबाद शहरातील अस्तित्वात असलेल्या गतिरोधकांची इंडियन रोड कॉंग्रेसच्या (आय.आर.सी.) मानकाप्रमाणे पुन:र्रचना करणेच्या कामाचे अंदाजपत्रक रू.११,९३,३४०/- चे असून या कामाची निविदा मागविण्यात आल्या असता **मे.आदीनाथ कन्स्ट्रक्शन** यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा **२१.९९% कमी दराची** एकमेव निविदा प्राप्त झाली. तरी मे.आदीनाथ कन्स्ट्रक्शन यांची निविदा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

सौ.लता दलाल : एकच टेंडर आलेले आहे मंजूर करणे योग्य वाटते काय?

मा.आयुक्त : मा. उच्च न्यायालयाचे आदेश आहे. काम करणे आवशक आहे.

मा.सभापती : प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहरातील अस्तित्वात असलेल्या गतिरोधकांची इंडियन रोड काँग्रेसच्या (आय.आर.सी.) मानकाप्रमाणे पुन:र्रचना करणेच्या कामासाठी प्राप्त झालेली मे.आदीनाथ कन्स्ट्रकशन यांची अं.प.दरापेक्षा २१.९९% कमी दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२३५ :**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, एन-८ सिडको भागात महानगरपालिका दवाखान्याच्या मागे १५ लाख लिटर्स क्षमतेचा खांबावरील जलकुंभ बांधण्यासाठी सिडकोकडून ना हरकत प्रमाणपत्र दिलेल्या जगेवर पाणी पुरवठा विभागाकडून रक्कम रूपये ४०,२२,१००/- च्या अंदाजपत्रकास सर्वसाधारण सभा ठराव क्र.१३०/२ दि.१९.१२.२००५ अन्वये मान्यता झाल्यानुसार सदर कामाच्या निविदा मागविण्यात आल्या असता, निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण सात निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण सात निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदाच्या दराबाबत तपशील पुढील प्रमाणे.

| | |
|---|---|
| १. रूद्राणी कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा १२.९९% कमी दराने |
| २. रॉक लाईन कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा १०.६०% कमी दराने |
| ३. एल.के. कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा ६.८६% कमी दराने |
| ४. मे.के.एन.नायडू | अं.प.दरापेक्षा ८.८८% कमी दराने |
| ५. मे.जयश्री कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा ९.१६% कमी दराने |
| ६. मे.सोहेल सिद्दीकी | अनुभव प्रमाणपत्राअभावी निविदा उघडली नाही. |
| ७. मल इंटरप्रायजेस | अनुभव प्रमाणपत्राअभावी निविदा उघडली नाही. |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त निविदांमध्ये तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा रूद्राणी कन्स्ट्रक्शन यांची असून, अंदाजपत्रकीय दरापेक्षा १२.९९% कमी दराची आहे. तरी रूद्राणी कन्स्ट्रक्शन यांची अं.प.दरापेक्षा १२.९९% कमी दराची निविदा स्विकृतीबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एन-८ सिडको भागात महानगरपालिका दवाखान्याच्या मागे १५ लाख लिटर्स क्षमतेचा खांबावरील जलकुंभ बांधण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा १२.९९% कमी दराची रूद्राणी कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२३६ :**

मा.आयुक्त प्रस्ताव सादर करत आहेत की, दि.१६.११.२००५ रोजेच्या स्थायी समितीने ठराव क्रमांक १०७ तसेच सर्वसाधारण सभा दि.२८.११.२००५ अन्वये सन २००६-२००७ साठी महापालिका हद्दीत आयात होणारा मालावरील जकात खाजगी अभिकर्त्यामार्फत वसुल करण्याबाबत मंजुरी दिल्यानुसार दि.२१.१२.२००५ रोजे वृत्तपत्रात टेंडर नोटीस प्रसिध्द करण्यात आली. दि.२१.१.२००६ पर्यंत म्हणजेच निविदा विक्रीच्या अखेरच्या तारखेपावेतो एकूण ०४ निविदांची विक्री झाली पैकी ०३ निविदा प्राप्त झाल्या. दि.२१.१.२००६ रोजे संध्याकाळी ५.०० वाजता निविदा उघडल्यानंतर खालील प्रमाणे निविदा प्राप्त झाल्या होत्या.

| अ.क्र. | निविदा भरणाऱ्या संस्थेचे नांव | देकाराची रक्कम रूपये |
|---|---|---|
| १ | सहकार एजन्सीजप्रा.लि. | ९८,१०,००,०००.०० |
| २ | साई शरण इन्फ्रास्ट्रक्चर्स कं. | ९५,००,००,०००.०० |
| ३ | अनुराधा सर्व्हीसेस प्रा.लि. | ९२,५०,००,०००.०० |

तथापी अपेक्षीत मुल्याएवढी निविदा प्राप्त न झाल्याने दि.२१.१.२००६ रोजे प्राप्त सर्व निविदा फेटाळण्यात आल्या. दिनांक २१.१.२००६ रोजे परत दुसऱ्यांदा निविदा सूचना प्रकाशीत करण्यात आली. दि.२४.१.२००६ रोजे संपन्न झालेल्या स्थायी समिती बैठकीत 'महाराष्ट्र शासनाच्या संबंधित विभागाकडून डायरेक्शन मागवावे आणि त्याप्रमाणे ही निविदा प्रक्रीया तो पर्यंत स्थगित करावी' असा निर्णय दिलेला होता. या संदर्भाने उप सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्र.औमपा/१००६/५७/प्रक्र११/०६/नवि-२४, दिनांक २.२.२००६ तसेच कक्ष अधिकारी, नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्र. औमपा/१००६/५७/प्रक्र११/६/नवि-२४, दिनांक ३.२.२००६ अन्वये प्राप्त शासनाचे मार्गदर्शनानुसार दि.४.२.२००६ रोजे वृत्तपत्रात सदरील जहिर निविदे संदर्भाने शुध्दीपत्रक (उज्छठखत्रॠछञाच) प्रकाशीत करण्यात आले व दि.१३.२.२००६ पावेतो निविदा स्विकारण्याची मुदत वाढविण्यात आली. सदरील बाबी संदर्भाने दिनांक ४.२.२००६ रोजे मा.सभापती, स्थायी समिती यांना अवगत करवण्यात आले.

दिनांक १३.२.२००६ रोजे दुपारी १२.०० वाजेपावेतो एकूण ०३ निविदांची विक्री झाली व दुपारी २.०० वाजेपावेतो एकूण ०२ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदा संबंधित एजन्सी धारकांसमोर सायंकाळी ५.०० वाजता उघडण्यात आल्या. प्राप्त निविदांचा तपशील खालील प्रमाणे.

| अ.क्र. | निविदा भरणाऱ्या संस्थेचे नांव | देकाराची रक्कम रूपये |
|---|---|---|
| १ | सहकार एजन्सीजप्रा.लि. | १०१,१६,९९,९९९.०० |
| २ | कोहीनूर इन्फ्रास्ट्रक्चर्स, उल्हासनगर | ९९,९९,९९,०००.०० |

जकात खाजगीकरणासाठी नेमलेल्या समितीने सर्वाधिक निविदा देकार असलेले मे.सहकार एजन्सीज प्रा.लि. मुंबई यांना वाटाघाटीसाठी बोलावण्यात यावे असा निर्णय घेतला. वाटाघाटी अंती मे.सहकार एजन्सीजप्रा.लि. मुंबई यांनी रू.१०१,२५,००,०००/- (रूपये एकशे एक कोटी पंचेवीस लक्ष फक्त) चा देकार लेखी स्वरूपात दिला.

मे.सहकार एजन्सीज प्रा.लि. मुंबई यांनी सर्वात जस्त म्हणजेच रू.१०१,२५,००,०००/- (रूपये एकशे एक कोटी पंचेवीस लक्ष फक्त) चा देकार दिलेला असल्याने निविदा सूचनेतील अटी व

शर्ती नुसार तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या अनुसूचि 'ड' मधील प्रकरण ८ चे नियम ३५ अन्वये जकात वसुलीसाठी खाजगी अभिकर्ता नियुक्त करण्यास मंजूरी देण्यासाठी तसेच दिनांक १ मार्च २००६ ते २८ फेब्रुवारी २००७ या कालावधीसाठी मे.सहकार एजन्सीज्प्रा.लि. मुंबई यांची जकात वसुली करण्यासाठी खाजगी अभिकर्ता म्हणून नियुक्ती करण्याची शिफारस करण्यात येते. प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री. गजनन बारवाल :या संबधी मा. आयुक्तांनी प्रस्तावित करावे त्यानंतर चर्चा करता येईल.

मा.आयुक्त : जकात खाजगीकरण करावे म्हणून दिनांक १६ नोंव्हेबर २००५ रोजी स्थायी समितीचेआदेश होते. त्यानंतर दिनांक २८ नोंव्हे. २००५ रोजी सर्वसाधारण सभेने मान्यता दिलेली आहे. स्थायी समितीने मान्यता दिल्यानंतर सर्वसाधारण सभेपूढे प्रस्ताव ठेवला सर्वसाधारण सभेनेही मान्यता दिलेली होती. यानंतर कार्यवाही सूरू झाली. या वर्षीची वसूली ही मागिल वर्षापेक्षा १५ टक्के जस्त झालेली आहे. त्यावर १० टक्के खाजगीकरणामूळे वाढ व २ टक्के अस्थापना खर्च असे गृहीत धरून निविदा काढलेली होती तीन निविदा आलेल्या होत्या. एक निविदा ९८.१० कोटी व दुसरी निविदा ९५ कोटी तसेच तिसरी निविदा ९२.९५ कोटीची होती. यामध्ये रिंग झालेली आहे अशी प्रशासनाची धारणा झाली व आवशक पाहिजे तेवढी रक्कम आलेली नव्हती. म्हणून पून्हा प्रयत्न करणे योग्य वाटले. म्हणून पून्हा निविदा काढण्यात आली होती. यात दोन टेंडर भरून आलेले आहे. सहकार एजन्सीज यांना वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले त्यांनी रूपये १०१.२५ कोटी देण्याचे मान्य केले. एजन्सी म्हणून नेमण्यासाठी १ मार्च ते २००६ ते २८ फेब्रुवारी २००७ पर्यत कालावधी देण्यात येईल. १ मार्च २००५ ते आजपर्यंत २८ फेब्रुवारी २००६ पर्यत जेवढी वसूली आहे त्यावर २६ टक्केची वाढ आहे. याच बरोबर २ कोटी खर्च हा अस्थापनेवरील होता. तेथील कर्मचारी इतर कामासाठी वापरता येतील. तो दोन कोटीचा फायदा आहे. जवळपास २३ कोटीचा फायदा आहे. शहराच्या विकासाच्या हिताचा हा प्रस्ताव आहे तो मंजूर करावा अशी प्रशासनाची विनंती आहे.

श्री.विनायक पांडे :चांगला प्रस्ताव आलेला आहे. २३ कोटीचा महापालिकेस फायदा पर्यायाने विकास कामे होतील .यात निकोप स्पर्धा झाली असे मा. आयुक्तांनी मान्य केल्यामूळे या प्रस्तावास मान्यता देण्यास यावी.

श्री.मुजेब खान :जकात खाजगीकरणाचा प्रस्ताव आला. सभागृहाची हीच भावना होती. प्रशासनही बरोबर आहे. बाहेरचे काही लोक राजकारण करून नवीन नवीन बातम्या वृत्तपत्रात येतात की शहरातील नागरीकांचे काय होणार. रस्त्यावर वाद होतील अशी भावना जनतेच्या मनात निर्माण करून दिली होती. संबधीत एजन्सी बरोबर करारनामा करणार आहे परंतू महापालिकेचे कर्मचारी सदर एजन्सी बरोबर किती दिवस काम करणार आहे. कोणते ही नवीन व्यक्ती आले नंतर माहिती असणारे कर्मचारी त्याचेबरोबर रहाणे आवशक आहे. जकातीची वसूली योग्य

प्रकारे होवू नये म्हणून काही लोक अडथळे आणतील या शहरात काही दलाल आहे. यात शंका नाही.यासाठी प्रशासनाने काय काळजी घ्यावयास पाहिजे ती घेतली घेण्यात यावी. जे वसूली होणार आहे ती कशा प्रकारे होईल. याची संपूर्ण माहिती देणे आवशक आहे.किती टक्के डिपॉजेट घेत आहोत. करारनामा काय झालेला आहे माहिती दयावी.

श्री.गजनन बारवाल : आपले प्रशासनाचे अभिनंदन करतो की अत्यंत जिद्दीने मेहनतीने व चांगल्या पध्दतीने प्रस्ताव आणलेला आहे. मा.आयुक्त यांनी जस्त मेहनत घेतलेली आहे. जकातीचे जे उद्दिष्ट होते ते जवळपास पूर्ण होत आहे. १०९ कोटीची अपेक्षा आपण करीत होतो परंतू जे १०१ कोटीचे टेडर आले ते सुध्दा कमी रक्कम नाही. हा प्रस्ताव मंजूर करतांना जे नियम व अटी शर्ती घालून देणार आहोत त्याचे काटेकोरपणे पालन होणे गरजेचे आहे. या एजन्सीची त्यांनी यापूर्वी केलेले काम व कामाचा दर्ज, केलेली वसूली या संबधीची माहिती दयावी. त्यानंतर हा प्रस्ताव मंजूर करावा अशी विनंती आहे.

श्री.मिलींद दाभाडे :खाजगीकरण झाल्यानंतर कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्यासाठी प्रशासनाने काय उपाययोजना केलेली आहे.

मा.सभापती :स.सदस्यांनी अत्यंत मौलीक भावना मांडलेल्या आहेत. करारनामा काय करणार आहे ते सभागृहासमोर येणे आवशक होते. जकात खाजगीकरण वसूली संदर्भात प्रशासनाची भुमिका तसेच शहरातील कायदा व सुव्यवस्था ठेवण्याच्या दृष्टीने व जकात वसूली करतांना महापालिकांची काय भूमिका असेल, हस्तक्षेपास मर्यादा आहेत काय? या सर्व बाबींचा जे करारनामा करणार आहे. त्याची माहिती देण्यात यावी. व त्याची लेखी माहिती स.सदस्यांना नंतर वितरीत करण्यात यावी. त्यामधे काही अडीअडचणी असतील व स. सदस्यांच्या सूचना असतील त्या सूचना मा. आयुक्त यांचेकडे सभापती म्हणून पाठविण्यात येतील.ज्या सुचना केल्या जतील त्या प्रमाणे करारनाम्यात दुरूस्त्या मा.आयुक्तांनी कराव्यात. उपआयुक्त महसूल यांनी सविस्तर माहिती सभागृहास द्यावी.

उपआयुक्त(महसूल) :ज्या तारखेपासून जकात वसूली ही खाजगी अभिकर्ता मार्फत सूरू होईल. त्याच दिवसापासून महानगरपालिकेचा एक स्वंतत्र कक्ष २४ तास शहरातील व्यापारी व नागरीकासाठी उपलब्ध करून दिला जईल. कोणत्या क्षणी कोणत्याही नाक्यावर कुठलीही तक्रार असेल ती तक्रार सोडविण्याचे काम या कक्षा मार्फत होईल. याच बरोबर जकात अधिक्षक कार्यालय अस्तित्वात असेल यासाठी काही नाका कारकून नाका निरीक्षक इ. कर्मचारी देणार आहोत. सदर कर्मचारी हे जकात खाजगी अभिकर्ता मार्फत योग्य प्रकारे जकात वसूल होते की नाही याचे निरीक्षण करतील व दररोज अहवाल उपआयुक्त तसेच मा.आयुक्त यांचेकडे सादर करतील. नागरीकांना कुठल्याही प्रकारचा त्रास होणार नाही याची खबरदारी प्रशासनाने घेतली आहे. टेंडर अट क्र.२६ मधे स्पष्ट असे म्हटले की

कोणतेही वाहन किंवा व्यक्तीला विनाकारण अडवून ठेवता येणार नाही. अशा बाबी वारंवार घडल्या तर संबधीत ठेकेदारास अगोदर सूचना दिली जईल. यानंतरही प्रकार घडत राहिला तर ठेका रद्य करण्याची तरतूद केलेली आहे. सहकार प्रा. एजन्सीज ही १९९४ पासून जकात खाजगीकरणाच्या वसुलीच्या कलेक्शनमधे आहे. या एजन्सीने एकूण १५ नगरपरीषद तसेच महानगरपालिकेत जकात खाजगीकरणाची वसूली केलेली आहे. १२ ते १५ वर्षाचा अनुभव असलेली ही एजन्सी आहे असे प्रशासनाचे मत आहे. जकात वसूली होत असतांना व्यापारी व नागरीकांवर कुठल्याही प्रकारचा अन्याय होणार नाही यासाठी प्रशासन प्रयत्नशील आहे. ज्या तक्रारी येतील त्याचे १०० टक्के निराकरण करण्यात येईल. त्यामूळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही. अट क्र. १६ मधे असे म्हटले की, जर पेमेन्ट देण्यास उशीर केल्यास एक आठवडयापर्यत नोटीस देवून व त्यानंतर २४ टक्के व्याजलावून दररोजचा दंडही आकारण्यात येईल. अट क्र.१३ मध्ये जेलोक काम करतील त्याची जबाबदारी महापालिकेवर नाही. महापालिकेस समान ५० हप्त्यात पेंमेन्ट मिळणार आहे. हप्त्याची रक्कम संबधीत एजन्सीने आठवडयाच्या दर शुक्रवारी भरणे आवशक आहे. जर शुक्रवार या दिवशी सार्वजनिक सुट्‌टी येत असेल तर आदल्या दिवशी रक्कम भरणे अपेक्षीत आहे. वेळेवर रक्कम भरणा केली नाही तर दंड आकारणी करण्याची तरतूद आहे.

श्री.रविकांत गवळी :आता लग्न कार्याचे दिवस असून लग्न समारंभासाठी येणाऱ्या वस्तुंवर जकात आकारणी होणार आहे काय याचा खूलासा करावा.

श्री.मुजीब खान :यापूर्वी लग्नासाठी लागणारे सामान यावर जकात आकारणी होत होती काय?

मा.आयुक्त :महापालिकेच्या माध्यमातून ज्यावर वसूली केली जत असे त्यावरच जकात आकरणी संबधीत एजन्सी करणार आहे.

उपआयुक्त,महसूल : लग्न किंवा कुठल्याही उत्सव प्रसंगी जेसामान शहरात येते त्यावर कुठलीही जकात आकारली जत नसे याच पध्दतीने जकात खाजगी अभिकर्ताही जकात आकारणी करणार नाही. त्या संबधीची तक्रार आल्यास त्याचे निराकरण केले जईल.

श्री.गजनन बारवाल : शासनाने व्हॅट लागू केला तर केलेल्या करारनाम्याबध्दल प्रशासनाची भुमिका काय असणार आहे.

मा.आयुक्त : शासनाने व्हॅट लागू केला तर ॲक्ट मध्ये तसे येईल. जकात वसुली बंद होईल.

श्री.गजनन बारवाल : केवळ नावासाठी खाजगीकरण करीत आहोत. अशी चर्चा कूठे होवू नये व्हॅट लागू केल्यानंतर वेगळया प्रकारची भूमिका न घेता नियमानूसार कार्यवाही व्हावी.

मा.आयुक्त : ज्या दिवशी पासून व्हॅट लागू होईल त्या दिवशीपासून जकात कर वसूली ठेका बंद होईल त्याचा काही भूर्दंड महापालिकेला पडणार नाही.

सौ.लता दलाल :प्रशासनाकडूनप्रस्ताव आलेला आहे त्याबध्दल प्रशासनाचे अभिनंदन करते. हेतू एवढाच होता की या महापालिकेचे उत्पन्न वाढले पाहिजे विकास कामे झाली पाहिजे या प्रस्तावास मान्यता दयावी व जकात विभागातील जे कर्मचारी आहे ते वार्ड कार्यालयात देण्यात यावे जेणे करून वसूली तसेच स्वच्छतेची कामे ही तत्परतेने होतील.

श्री.दिलीप गायकवाड :दररोजची जी जकात वसूली होणार आहे त्याचे रेकॉर्ड महापालिकेकडे असणार आहे काय?

श्री.मिलींद दाभाडे :संबधीत एजन्सीकडे जे कर्मचारी काम करणार आहे ते जिल्हयातून हद्यपार झालेले नसावे किंवा गुंड प्रवृत्तीचे नसावे. नसता शहरात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल. छावनीच्या टोल नाक्यावर यापूर्वी वसूली करीत असतांना एका व्यक्तीचा खून करण्यात आलेला होता. त्याची पुर्नरावृत्ती जकात वसूलीच्या ठिकाणी होवू नये याची दखल घ्यावी.

श्री.गजनन बारवाल :सभागृहाने या विषयास एक मताने पांठीबा दिलेला असून या प्रस्तावास मान्यता दयावी अशी विनंती आहे.

श्री.मुजीब खान : मा.सभापती तसेच मा.आयुक्त यांचे अभिनंदन करतो की जस्तीत जस्त मेहनत घेवून या शहरातील नागरीकांचे विकास कामे होण्यासाठी अत्यंत चांगला प्रस्ताव सादर केलेला आहे. महापालिकेचे उत्पन्न वाढणार आहे. जकात वसूली संदर्भात जसा निर्णय घेतला त्याच प्रमाणे इतर काही माध्यमातून महापालिकेस उत्पन्न मिळेल त्यासाठीही प्रयत्न करावेत. विनंती की, जकात विभागातील जेकर्मचारी यांना वसूलीचे काम न देता इतर कामे द्यावेत.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन २००६-२००७ साठी औरंगाबाद महापालिका हद्दीत आयात होणाऱ्या मालावरील जकात खाजगी अभिकर्त्यामार्फत वसुल करण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदा पैकी जस्त देकार असलेले निविदाधारक मे.सहकार एजन्सीज्‌प्रा.लि.मुंबई यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार रक्कम रू.१०१,२५,००,०००/- (रूपये एकशे एक कोटी पंचेवीस लक्ष फक्त) चा देकार असलेली निविदा स्विकारणेस व दि.१ मार्च २००६ ते २८ फेब्रुवारी २००७ या कालावधीसाठी मे.सहकार एजन्सीज्‌प्रा.लि.मुंबई यांची जकात वसुली करण्यासाठी खाजगी अभिकर्ता म्हणून नियुक्ती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळचे विषय

**विषय क्र.२३७ :**

कार्यकार अभियंता (ड्रे.वि.इ.व उ.बां.) प्रस्ताव सादर करीत आहे की, मो.भावसिंगपुरा येथील महानगरपालिकेच्या खुल्या जगेत आरोग्य केंद्र बांधण्यात आलेले असून सदरील आरोग्य केंद्राच्या उर्वरीत कामाचे र.रू.१,४०,९९१/- चे अंदाजपत्रक सा.बां.विभागाच्या सन २००४-०५ च्या जिल्हा दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून सदर कामाचा खर्च दि.२२/११/२००५ रोजे संपन्न झालेल्या स्थायी समिती

सभेनुसार अर्थसंकल्प सन २००५-०६ मधील पान क्र./अ.क्र.१७३/२७ मधील कामाच्या तरतूदी मधून सदरील कामासाठी वळती केलेल्या रक्कम रूपये १.४३ लक्षच्या तरतूदीतून करण्यात येणार आहे.

सदरील आरोग्य केंद्राचे काम त्वरीत चालू करणे आवश्यक असल्याने व कामाची तातडी लक्षात घेता सदर काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७% कमी दराने आरोग्य केंद्राच्या मुळ कामाचे गुत्तेदार श्री.एस.ए.नवाब यांच्या मार्फत करून घेण्यास मंजूरी बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.भावसिंगपुरा येथील महानगरपालिकेच्या खुल्या जगेत बांधण्यात आलेल्या आरोग्य केंद्राचे उर्वरीत र.रू.१,४०,९९१/- खर्चाचे काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७% कमी दराने आरोग्य केंद्राच्या मुळ कामाचे गुत्तेदार श्री.एस.ए.नवाब यांच्या मार्फत करून घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२३८ :**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहेत की, औरंगाबाद महानगरपालिका वॉर्ड 'ड' अंतर्गत १६९१९ मालमत्ता असून १०७८५ नळ कनेक्शन्स आहेत. तर वॉर्ड फ अंतर्गत २४९०२ मालमत्ता असून ११४०० नळ कनेक्शन्स आहेत. या एकूण ६४००६ मिळकतींचे मालमत्ता व पाणीपट्टी कराच्या मागणीचे संगणकीकरण करण्याची तयारी मे.सारंग इंटरप्रायजेस, उल्कानगरी औरंगाबाद या संस्थेने दर्शविलेली आहे. सदरील वॉर्डातील मिळकतींचे व नळ कनेक्शन्सचे संगणकीकरण केल्यास त्या वॉर्डातील मिळकतींचे मिळकत निहाय मागणी, वसुली तात्काळ प्राप्त होऊ शकेल. मिळकत धारकांना मागणी नोटीसा देणे शक्य होईल. खालील अटी व शर्तींच्या अधिन राहुन मे.सारंग इंटरप्रायजेस यांना वॉर्ड ड व फ मधील मिळकतींचे संगणकीकरण करण्याचे काम देणे योग्य राहील.

१. संस्थेने मिळकतींचे व नळ कनेक्शन धारकांचे संगणकीकरण यासाठीचे सॉफ्टवेअर डेव्हलप करावे.
२. वॉर्ड ड व फ मधील मिळकतींची व नळ कनेक्शन धारकांची संगणकीकृत यादी तयार करावी. यासाठी प्रती मिळकत रूपये २/- याप्रमाणे संबंधीतास मावेज देण्यात येईल. सर्व संगणकीकरण दि.२८/२/२००६पुर्वी करावे.

**मालमता कर :**

| अ.क्र | मालमत्ता धारकाचे नांव | पत्ता | पत्ता | घर क्र. | रजिस्टर क्र. | पृष्ठ क्र. | करयोग्य मुल्य | थकबाकी | थकबाकी चे वर्ष | चालु मागणी | एकुण मागणी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |

**पाणीपट्टी कर :**

| अ.क्र | मालमत्ता धारकाचे नांव | पत्ता | पत्ता | घर क्र. | रजिस्टर क्र. | पृष्ठ क्र. | नळाचा प्रकार | थकबाकी | थकबाकी चे वर्ष | चालु मागणी | एकुण मागणी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |

३. कंपनीने तयार केलेला प्रोग्राम मनपाच्या वॉर्ड ड व फ मधील संगणकावर अपलोड करून द्यावेत.

सदरील प्रोग्राम कंपनीने मनपास विना शुल्क उपलब्ध करून द्यावा.

४. देय रक्कम वर नियमानुसार सेवाकर मनपाने द्यावेत.

प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

मा.आयुक्त :३१ मार्च पूर्वी कार्यवाही करावी लागणार आहे. त्यामूळे विना टेडर प्रस्ताव आलेला आहे.

मा.सभापती :एनवेळचे दोन्ही प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या वॉर्ड ड व फ अंतर्गत असलेल्या मालमत्ता तसेच नळ कनेक्शन्स असे एकूण ६४००६ मिळकतींचे मालमत्ता व पाणीपट्टी कराच्या मागणीचे संगणकीकरण मे.सारंग इंटरप्रायजेस, उल्कानगरी औरंगाबाद यांचेमार्फत प्रती मिळकत रूपये २/- याप्रमाणे करून घेण्यास प्रस्तावात दर्शविलेल्या इतर अटी-शर्तीस अधिन राहून सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२३९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.३५ अंतर्गत कोतवालपुरा, बारापुल्ला, अलंकार कॉलनी रस्त्याचे पुन:डांबरीकरणकरण्याचे काम पोलीस आयुक्त कार्यालय परिसरात करण्यास मा.स्थायी समिती ठराव क्र.२२१ दि.७/२/२००६ अन्वये पारीत झालेला आहे. प्रत्यक्ष काम करीत असतांना कामाचे स्वरूप पाहता मुळ मंजूर अंदाजपत्रकीय रक्कम रू.६,२६,९८१/- मध्ये वाढ होत असून वाढीव काम करण्यास रू.८,९५,४००/- खर्च येत आहे.

तरी वाढीव कामाचे सुधारीत अंदाजपत्रकाचा प्रस्ताव व सदर काम या कामाचे मुळ एजन्सीकडून मंजूर दरानुसार करून घेण्याच्या मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे स्थायी समिती ठराव क्र.२२१ दि.७/२/२००६ अन्वये मान्यता दिलेल्या प्रभाग क्र.३५ अंतर्गत कोतवालपुरा, बारापुल्ला, अलंकार कॉलनी रस्त्याचे पुन:डांबरीकरणाचे कामात वाढ झाल्याने वाढीव काम करण्यासाठीचे र.रू.८,९५,४००/- च्या खर्चास व सदर काम या कामाचे मुळ एजन्सीकडून मंजूर दरानुसार करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२४० :**

कार्यकारी अभियंता (ड्रे.वि.इ.व उ.)प्रस्ताव सादर करीत आहेत की, मित्रनगर येथील मनपाचे निवासस्थानामध्ये बाथरूम व्यवस्था नाही तसेच इतर दुरूस्तीची कामे करणे आवश्यक असल्यामुळे सदरील कामासाठी रक्कम रूपये १,४७,५६०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम तातडीने हाती घ्यावयाचे असल्याने व मार्च २००६ पर्यंत पूर्ण करावयाचे असल्याने सदरील अंदाजपत्रकास मा.आयुक्त, महानगरपालिका औ'बाद यांची मान्यता झाली असून कामाची तातडी लक्षात घेता उपलब्ध गुत्तेदार श्री.संतोष चव्हाण यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्याच्या मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मित्रनगर येथील मनपाचे निवासस्थानामध्ये बाथरूम व्यवस्था करणे तसेच इतर दुरूस्तीच्या कामासाठी तयार केलेल्या रक्कम रूपये १,४७,५६०/- चे अंदाजपत्रकास

तसेच कामाची तातडी लक्षात घेता सदरील काम उपलब्ध गुत्तेदार श्री.संतोष चव्हाण यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२४१ :**

कार्यकारी अभियंता (जलनि:सारण, विद्युत, इमारती व उद्याने) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिका मुख्य कार्यालयाच्या स्थायी समिती सभागृह नुतनीकरण करणे व मा.सभापती (स्थायी समिती) दालनाची दुरूस्ती करणे या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रूपये २,४९,१००/- चे सा.बां.खात्याची दरसूची सन २००४-०५ नुसार तयार करण्यात आले आहे. सदर काम तातडीचे असल्याने उपलब्ध ठेकेदार श्री.आर.बी.रूडसमुद्र यांचे मार्फत काम सुरू करण्यात आले आहे.

तरी वरील प्रमाणे अंदाजपत्रकीय रक्कम रूपये २,४९,१००/- चे काम श्री.आर.बी.रूडसमुद्र यांच्या नांवे कार्योत्तर मंजुरी तसेच सदर कामास तरतूद उपलब्ध करून देणे बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका मुख्य कार्यालयाच्या स्थायी समिती सभागृह नुतनीकरण करणे व स्थायी समिती सभापती यांचे दालनाची दुरूस्ती करणेचे रक्कम रूपये २,४९,१००/- खर्चाचे काम उपलब्ध ठेकेदार श्री.आर.बी.रूडसमुद्र यांचेमार्फत अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यात येणाऱ्या कामास कार्योत्तर मंजुरी देण्यात येते. सदर कामाकरीता सुधारीत अर्थसंकल्पात प्रशासकीय इमारत टप्पा क्र.१, २,३ या लेखाशिर्षांतर्गत तरतुद करण्यात यावी. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२४२ :**

कार्यकारी अभियंता (जलनि:सारण, विद्युत, इमारती व उद्याने) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिका मुख्य इमारती मधील प्रबोधनकारक ठाकरे मुख्य सभागृहासमोर तळीौळषळशव ऋरळिंश फ्लोरींग करणे, कँटीन बनविणे तसेच प्रसाधनगृहाची दुरूस्ती करण्याच्या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रूपये २,४९,९२०/- चे सा.बां.खात्याची दरसूची सन २००४-०५ नुसार तयार करण्यात आले आहे. सदर काम तातडीचे असल्याने उपलब्ध ठेकेदार श्री.एस.एस.मोटेगांवकर यांचे मार्फत काम सुरू करण्यात आले आहे.

तरी वरील प्रमाणे अंदाजपत्रकीय रक्कम रूपये २,४९,९२०/- चे काम श्री. एस.एस.मोटेगांवकर यांच्या नांवे कार्योत्तर मंजुरी तसेच सदर कामास तरतूद उपलब्ध करून देणे बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका मुख्य कार्यालयाच्या स्थायी समिती सभागृह नुतनीकरण करणे व स्थायी समिती सभापती यांचे दालनाची दुरूस्ती करणेचे रक्कम रूपये २,४९,९२०/- खर्चाचे काम उपलब्ध ठेकेदार श्री. एस.एस.मोटेगांवकर यांचेमार्फत अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यात येणाऱ्या कामास कार्योत्तर मंजुरी देण्यात येते. सदर कामाकरीता सुधारीत अर्थसंकल्पात प्रशासकीय इमारत टप्पा क्र.१, २,३ या लेखाशिर्षांतर्गत तरतुद करण्यात यावी. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद :**

श्री.मुजीब खान :वार्ड ''क''मध्ये कोणतेही विकास कामे होत नाही. विचारणा केली असता सभापती सभा घेत नाही प्रस्ताव मंजूर होत नाही म्हणून कामे होत नाही असे सांगण्यात येते.सर्व संचिका कपाटमधे प्रलंबीत आहे.

मा.सभापती :या भागातील विकास कामाच्या संदर्भात ज्या संचिका असतील त्या संचिका उपआयुक्त प्रशासन यांनी स्थायी समितीसमोर सादर कराव्यात.

राष्ट्रगीतानंतर सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषीत केले.

**नगर सचिव**

महानगरपालिका औरंगाबाद